आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता

११ जून २०२६ - गुरुवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- प्रधानमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली नवी दिल्लीत नीती आयोगाच्या नियामक परिषदेची अकरावी बैठक सुरू

- इथेनॉल मिश्रित पेट्रोलला केंद्रीय उत्पादन शुल्कातून सूट देण्याचा सरकारचा निर्णय

- २०२४ आणि २०२५ साठीच्या संगीत नाटक अकादमी पुरस्कारांची घोषणा; महाराष्ट्रातून गायक अरूण कशाळकर, आनंद भाटे, अभिनेता अरूण नलावडे यांचा सन्मान

**आणि**

- फिफा फुटबॉल विश्वचषक स्पर्धेला आजपासून सुरुवात

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली आज नवी दिल्लीत राष्ट्रपती भवन इथं नीती आयोगाच्या नियामक परिषदेची अकरावी बैठक सुरू आहे. दोन हजार सत्तेचाळीसच्या विकसित भारतासाठी सर्वसमावेशक मानवी विकास ही या बैठकीची संकल्पना आहे. देशभरात उद्योजकतेला चालना देणं, कौशल्य विकासात वृद्धी घडवणं आणि रोजगाराच्या शाश्वत संधी निर्माण करण्यासाठीच्या उपाययोजना हे या बैठकीतले विषयय आहेत. यासोबतच उत्तरदायित्व आणि प्रभावाच्या मूल्यमापनाची सुनिश्चिती करून सुशासन, डिजिटल सार्वजनिक पायाभूत सुविधा आणि भागीदारीच्या आधारे सामूहिक अंमलबजावणी आराखडा तयार करण्यावरही या बैठकीत चर्चा होणार आहे.

या बैठकीच्या निमीत्तानं देशभरातल्या राज्य आणि केंद्रशासित प्रदेशांचे मुख्यमंत्री आणि नायब राज्यपाल एकत्र आले आहेत.

**<><><><><>**

शेतकऱ्यांचं कल्याण केंद्र सरकारच्या सर्वोच्च प्राधान्यक्रमांपैकी एक असल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. यासंदर्भात त्यांनी समाजमाध्यमावर एक संदेश मालिका सामायिक केली आहे. शेतकऱ्यांच्या जगण्यात सुलभता आणण्यासाठी केंद्र सरकार

कोणतीही कसर सोडत नाहीए, शेतकरी हे देशाची अन्न सुरक्षा, पोषण आणि समृद्धीचा पाया आहेत असंही त्यांनी आपल्या संदेशात आहेत.

शेतकऱ्यांच्या उत्पन्नाचं रक्षण आणि कृषी क्षेत्राला बळकटी देण्याच्या उद्देशानं प्रधानमंत्री किसान सन्मान निधी, पीक विमा योजना, प्रधानमंत्री कुसुम योजना, या माध्यमातून शेतकऱ्यांना दिल्या जात असलेल्या पाठबळाचा उल्लेखंही त्यांनी आपल्या संदेशात केला आहे. किसान क्रेडिट कार्ड शेतकरी, पशुपालक आणि मच्छिमारांसाठी लाभदायक ठरत असल्याचंही त्यांनी म्हटलं आहे.

**<><><><><>**

परराष्ट्र व्यवहार मंत्री डॉ. एस. जयशंकर यांनी काल सोफिया इथे बल्गेरियाचे प्रधानमंत्री रुमेन रादेव यांची भेट घेतली. यावेळी भारत आणि बल्गेरिया यांच्यातले मजबूत द्विपक्षीय संबंध, दोन्ही देशांमधली धोरणात्मक द्विपक्षीय भागीदारी अधिक दृढ झाल्यामुळे निर्माण झालेल्या संधी आणि वाढत्या अस्थिरतेच्या काळात जोखीम कमी करण्यासाठी द्विपक्षीय सहकार्याची गरज या विषयांवर चर्चा झाली. दोन्ही देशांमध्ये व्यापार आणि गुंतवणूक, औषधनिर्माण, सेमीकंडक्टर्स, कृत्रिम बुद्धिमत्ता, अंतराळ, संरक्षण, गतिशीलता, पर्यटन आणि सर्जनशील मनोरंजन उद्योग या क्षेत्रांमधील सहकार्य अधिक वाढवण्याबाबत चर्चा केली, असं जयशंकर यांनी आपल्या समाज माध्यमावरच्या संदेशात म्हटलं आहे.

यानंतर, डॉ. जयशंकर 'कुलतारंता टॉक्स'च्या १४ व्या आवृत्तीत सहभागी होण्यासाठी आज फिनलंडला भेट देणार आहेत. ही चर्चासत्रं "बदलते जग: जागतिक, प्रादेशिक आणि स्थानिक दृष्टिकोन" या विषयावर आयोजित केली जाणार आहेत.

**<><><><><>**

राजस्थानात जैसलमेर जिल्ह्यातल्या रामगड इथे २०-किलोवॅट क्षमतेच्या एफएम ट्रान्समीटरचं उद्घाटन आज माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांनी दूरस्थ पद्धतीनं केलं. जयपूरमधील आकाशवाणीच्या आवारात आयोजित या कार्यक्रमाला जयपूरच्या खासदार मंजू शर्मा, प्रसार भारतीचे अध्यक्ष प्रसून जोशी आणि आकाशवाणीचे महासंचालक राजीव कुमार जैन यांच्यासह इतर वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. उपस्थितांना संबोधित करताना, केंद्रीय मंत्री वैष्णव यांनी धोरणात्मक पायाभूत सुविधांवर भर देत, सीमावर्ती

भागातील दळणवळण व्यवस्था बळकट करण्याबाबतच्या सरकारच्या कटिबद्धतेचा पुनरुच्चार केला.

<><><><><>

काँग्रेस नेत्या मीनाक्षी नटराजन यांनी, त्यांचा राज्यसभा निवडणुकीचा उमेदवारी अर्ज फेटाळण्याच्या निर्णयाला सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिलं आहे. निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी बेकायदेशीर, मनमानी आणि पूर्वग्रहानं ही कारवाई केल्याचा दावा त्यांनी आपल्या याचिकेत केला आहे. न्यायालयानं या याचिकेवर तातडीनं सुनावणी घ्यावी अशी मागणीही त्यांनी केली आहे.

ज्येष्ठ वकील अभिषेक मनू सिंघवी यांनी आज सर्वोच्च न्यायलयाचे न्यायाधीश न्यायमूर्ती पी. के. मिश्रा आणि न्यायमूर्ती अतुल एस. चांदूरकर यांच्या खंडपीठासमोर या प्रकरणाचा उल्लेख केला. हे अत्यंत निकडीचं प्रकरण असून, त्यावर लवकर सुनावणी घ्यावी अथवा एका ओळीचा अंतरिम आदेश द्यावा अशी विनंती त्यांनी न्यायालयाला केली. त्यानंतर न्यायालयानं न्यायालयानं उद्या या प्रकरणाची सुनावणी निश्चित केली आहे.

<><><><><>

काँग्रेसचे सर्व सरचिटणीस, विविध राज्यांचे प्रभारी आणि प्रदेशाध्यक्ष यांची बैठक आज नवी दिल्लीत झाली. या बैठकीत काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे, राहुल गांधी, काँग्रेसचे सरचिटणीस प्रियांका गांधी वाड्रा, के. सी. वेणुगोपाल, जयराम रमेश, भूपेश बघेल, तसेच विविध राज्यांचे प्रभारी आणि प्रदेशाध्यक्ष सहभागी झाले होते. या बैठकीत सध्याची राजकीय परिस्थिती आणि पक्षाची पुढची वाटचाल यांबाबत चर्चा करण्यात आली.

<><><><><>

तृणमूल काँग्रेसचे राज्यसभा खासदार प्रकाश चिक बराईक यांनी आज सदस्यत्वाचा राजीनामा दिला. प्रकाश यांनी राज्यसभेचे अध्यक्ष सी. पी. राधाकृष्णन यांच्याकडे राजीनामा पाठवला आहे. याआधी तृणमूलच्या सुखेंदु शेखर राय आणि सुष्मिता देव यांनी राजीनामा दिला होता.

<><><><><>

सरकारनं इथेनॉल मिश्रित पेट्रोलला केंद्रीय उत्पादन शुल्कातून सूट दिली आहे. बीआयएस मानकांनुसार असलेल्या २२ टक्के, २५ टक्के, २७ टक्के आणि ३० टक्के इंधन

मिश्रणांवर शून्य उत्पादन शुल्क आकारलं जाईल. अर्थमंत्रालयानं आज यासंदर्भातली अधिसूचना जारी केली. भारताचं कच्च्या तेलावरील अवलंबित्व कमी करण्यासाठी आणि ऊस उत्पादक शेतकऱ्यांना आर्थिक बळ देण्यासाठी हा निर्णय घेण्यात आला आल्याचं याबाबतच्या वृत्तात म्हटलं आहे.

<><><><><>

जम्मू-काश्मीरमधील उरी सेक्टरमध्ये नियंत्रण रेषेजवळ मंगळवारी झालेल्या हॅन्ड ग्रेनेडच्या स्फोटात महाराष्ट्रातले दोन जवान शहिद झाले. विक्रम बाळकृष्ण चव्हाण हे नवी मुंबईतल्या ऐरोली इथले तर अर्जुन राजेंद्र जाधव हे सातारा जिल्ह्यातल्या शहापूरचे रहिवासी होते. उरी सेक्टरमध्ये कमलकोट इथं गस्तीवर असताना एका कारवाईमध्ये या हॅन्ड ग्रेनेडचा स्फोट झाला. यातच दोन्ही जवानांना वीरमरण आलं.

<><><><><>

उत्तर प्रदेशात गंगा द्रुतगती महामार्गावर काल झालेल्या एका रस्ते अपघातात ३ जणांचा मृत्यू झाला तर ८ जण जखमी झाले. मृतांमधले तिघेही एकाच कुटुंबातले सदस्य आहेत. जम्मू काश्मीरमध्ये सुट्ट्यांचा आनंद घेऊन हे कुटुंब लखनौला परतत असताना चालकाला डुलकी लागल्यानं त्याचं गाडीवरचं नियंत्रण सुटलं आणि गाडी दुभाजकावर आदळली. जखमींना स्थानिक रुग्णालयात दाखल करण्यात आलं असून त्यापैकी तिघांची प्रकृती गंभीर आहे, असं पोलिसांनी सांगितलं आहे.

<><><><><>

बिहारमधे खगरिया जिल्ह्यात आज सकाळी वीज पडून तिघांचा मृत्यू झाला. पाऊस सुरू असल्यामुळे हे तिघे एका झाडाखाली आश्रयासाठी बसले होते, त्याचवेळी त्यांच्या अंगावर वीज पडून त्यांचा मृत्यू झाल्याचं खगरियाच्या पोलीस अधीक्षकांनी सांगितलं.

<><><><><>

केंद्रीय कामगार आणि रोजगार राज्यमंत्री शोभा करंदलाजे यांनी काल स्वित्झर्लंडमध्ये जिनिव्हा इथे आयोजित आंतरराष्ट्रीय कामगार परिषदेत सहभाग घेतला. भारताने २९ केंद्रीय कामगार कायद्यांचं चार कामगार संहितांमध्ये एकत्रीकरण केल्याचं करंदलाजे यांनी यावेळी सांगितलं. कायद्यांचं पालन सुलभ करणं, कामगारांचं कल्याण सुनिश्चित करणं आणि एक

आधुनिक आणि पारदर्शक कामगार व्यवस्था निर्माण करणं या उद्देशानं या कामगार संहिता बनवण्यात आल्याचं त्या म्हणाल्या.

वेगानं होणाऱ्या जागतिक बदलांच्या काळात सामाजिक न्याय आणि सन्मानजनक रोजगाराला चालना देण्यासाठी आंतरराष्ट्रीय कामगार संघटनेने केलेल्या सातत्यपूर्ण नेतृत्वाचं कौतुकही करंदलाजे यांनी यावेळी केलं. 'नॅशनल करिअर सर्व्हिस पोर्टल' आणि 'ई-श्रम पोर्टल'च्या माध्यमातून कामगार आणि रोजगार क्षेत्रात 'डिजिटल सार्वजनिक पायाभूत सुविधा' विकसित करण्याबाबत भारतानं केलेल्या प्रगतीवर त्यांनी विशेष भर दिला.

**<><><><><>**

सांस्कृतिक मंत्रालयानं वर्ष २०२४ आणि २०२५ साठीच्या संगीत नाटक अकादमी पुरस्कारांची घोषणा केली आहे. अकादमीच्या सर्वसाधारण परिषदेनं संगीत, नृत्य, नाट्य, पारंपरिक, लोककला, आदिवासी कला आणि बाहुलीनाट्य यांसारख्या विविध क्षेत्रांतल्या १०८ कलाकारांची या पुरस्कारांसाठी निवड केली आहे. तर उस्ताद बिस्मिल्लाह खान युवा पुरस्कारांसाठी १०६ युवा कलाकारांची निवड करण्यात आली आहे. यामध्ये महाराष्ट्रातले कथक नृत्यगुरु मनीषा साठे, गायक पंडित अरुण कशाळकर, संगीत रंगभूमीवरील गायक अभिनेते मुकुंद मराठे, गायक आनंद भाटे, अभिनेते अरुण नलावडे, दिग्दर्शक प्रमोद पवार, भारूडकार भावार्थ देखणे आदींचा समावेश आहे.

**<><><><><>**

फिफा फुटबॉल विश्वचषक स्पर्धा २०२६ ला आजपासून सुरुवात होत आहे. अमेरिका, कॅनडा आणि मेक्सिको हे यंदाच्या विश्वचषक स्पर्धेचे यजमान आहेत. मेक्सिको आणि दक्षिण आफ्रिकेतल्या सामन्यानं स्पर्धेला सुरुवात होईल. त्यानंतर आजच संध्याकाळी दक्षिण कोरिया आणि चेकिया यांच्यात सामना होणार आहे. यंदाच्या स्पर्धेत ४८ संघ सहभागी झाले असून, तीनही यजमान देशांना स्पर्धेत थेट प्रवेश मिळाला आहे.

स्पर्धेत चार संघांचे १२ गट असतील. गट साखळी फेरीत एकूण ७२ सामने होतील. त्यानंतर प्रत्येक गटातले दोन अव्वल दोन संघ आणि सर्व गटांमधले तिसऱ्या क्रमांकावरचे सर्वोत्कृष्ट आठ संघ असे एकूण ३२ संघ बाद फेरीत प्रवेश करतील. यंदाच्या स्पर्धेत एकूण १०४ सामने होतील. स्पर्धेचा अंतिम सामना १९ जुलैला न्यू जर्सी इथल्या मेटलाइफ

स्टेडियमध्ये होणार आहे. भारतीय वेळेनुसार भारतात हा सामना २० जुलैला रात्री साडेबारा वाजता पाहता येईल.

<><><><><>

सर्वाधिक काळ भारताच्या प्रधानमंत्रीपदी राहिल्याचा विक्रम केल्याबद्दल प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचं अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी अभिनंदन केलं आहे. मोदी हे एक बुद्धिमान व्यक्ती असल्याचे गौरवोद्गार त्यांनी काढले. रशिया आणि  इस्त्रायलनंही प्रधानमंत्री मोदी यांचं अभिनंदन केलं आहे.

//<><><><><>//